**वाचले :-**

१) साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
२) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
३) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
५) या कार्यालयाचा मनाई आदेश क्र.गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/एस.आर.३९/२० दि.३१/०७/२०२०
६) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.२९/०७/२०२०.
७) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.पालघर यांनी सादर केलेली दि.११/०८/२०२० रोजीची टिपणी.
८) या कार्यालयाचा मनाई आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/एस.आर.४२/२० दि.११/०८/२०२०.

---

क्र./गृह/का.१/टे.४/मनाई आदेश/एस.आर.४३/२०
जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर
दिनांक १२/०८/२०२०

**सुधारीत आदेश :**

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधित करणे आवश्यक असल्याने उपोद्घातातील अ.क्र.६ अन्वये पालघर जिल्हयात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दिनांक ३१/०८/२०२० पर्यंत निर्गमित करण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी, पालघर नगरपरीषद क्षेत्रात आतापर्यंत कोरोना विषाणू संसर्गामुळे ४४२ रुग्ण बाधित झाले असून सदर कार्यक्षेत्रातील निकट सहवासित अधिक प्रमाणात कोरोना बाधित झाल्याचे आढळून आल्याने पुढील काळात हा संसर्ग अधिक वाढण्याची शक्यता आहे. सबब कोरोनाचा संसर्ग अधिक वाढू नये म्हणून पालघर नगरपरीषद क्षेत्रात संपुर्ण लॉकडाऊन करणे आवश्यक असल्याने या कार्यालयाचे उपोद्घातातील आदेश क्र.८ अन्वये पालघर नगरपरीषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये दिनांक १४/०८/२०२० रोजी ००.०१ ते दिनांक १८/०८/२०२० रोजी २४.०० वाजेपर्यंतच्या कालावधीमध्ये सर्व प्रकारच्या हालचाली करणेकरीता लागू करण्यात आलेल्या मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे. मात्र सदर मनाई आदेशामध्ये काही बाबींना सुट देणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **डॉ. कैलास बा. शिंदे, जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये **पालघर नगरपरीषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये दिनांक १४/०८/२०२० रोजी ००.०१ ते दिनांक १८/०८/२०२० रोजी २४.०० वाजेपर्यंतच्या कालावधीमध्ये सर्व प्रकारच्या हालचाली करणेकरीता मनाई आदेश लागू करीत आहे. सदर आदेशातून खालील बाबी वगळण्यात येत आहे.**

१) सर्व प्रकारचे दुकाने व हॉटेल्स बंद राहतील (मेडीकल शॉप व डेअरी वगळून)

२) सर्व प्रकारची खाजगी वाहने बंद राहतील. (अत्यावश्यक / शासकीय सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांची वाहने वगळून)
३) सर्व प्रकारचे औद्योगिक कारखाने बंद राहतील (अत्यावश्यक वगळता)
४) सदर कार्यक्षेत्रात कार्यरत पेट्रोल पंपावर अत्यावश्यक / शासकीय सेवेकरीताच इंधन उपलब्ध करुन देण्यात यावे.
५) सदर ठिकाणी सुरु मासळी बाजार व उघडयावरील बाजार पुर्णत: बंद करुन राहील.
६) पालघर नगर परीषदेने सार्वजनिक शौचालयाच्या ठिकाणी सोडीयम हायपोक्लोराईट द्रावण उपलब्ध करुन दिवसातून किमान सहा वेळी निर्जंतुकीकरण करण्यात यावे.
७) सदरहू क्षेत्रात अत्यावश्यक सेवा व बँकांनी टोकन पध्दतीचा अवलंब करुन सूरु राहतील.
८) शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील दि.१०/०८/२०२० रोजीचे परीपत्रकानुसार भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७३ वा वर्धापनदिन साजरा करण्याकरीता सदरच्या आदेशातून सवलत राहील.
**९) पालघर शहरामध्ये दि.१४ ऑगस्ट २०२० रोजी हुतात्मा दिन साजरा करण्यासाठी सवलत राहील.**
**१०)दुध डेअरी या सकाळी ०६.०० ते सकाळी १०.३० वा.पर्यंत सुरु राहतील.**

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(२) अन्वये प्राप्त अधिकारानूसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

कोणत्याही व्यक्तीने सदर आदेशाचा भंग केल्यास संबंधितांविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१ ते ६० मधील तरतुदीनुसार व भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दिनांक १२/०८/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-xxx**
(डॉ.कैलास बा.शिंदे)
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

**प्रत :-**
१) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
४) उपविभागीय दंडाधिकारी पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
५) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६) जिल्हा आरोग्य अधिकारी पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) गट विकास अधिकारी पंचायत समिती पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
९) मुख्याधिकारी, नगरपरीषद पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१०) जिल्हा महिती अधिकारी पालघर यांना आवश्यक त्या प्रसिध्दीकरीता.
११) पालघर तालुक्यातील सर्व शासकीय/निमशासकीय/महामंडळे/खाजगी आस्थापना यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

जिल्हा दंडाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

**जिल्हादंडाधिकारी पालघर**